सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**आरोग्य विभाग**

इंद्रभुवन पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर 4130

Email :- mohsolapur@gmail.com

जा.क्र./आअ/NUHM/नि. आदेश / / E-36434 दिनांक: / ०७ / २०२५

**-: कार्यालयीन आदेश :-**

**संदर्भ:-** १. आरोग्यधिकारी यांचे E - 36434, दि.२८/०४/२०२५ चे ई प्रस्ताव (नोट क्र. ३०६)

२. जा.क्र. /आअ / NUHM / ७६७ दिनांक: ०२ / ०५ / २०२५ E-36434 चे जाहिर प्रसिध्दिकरण.

३. दिनांक २६ /०६ / २०२५ रोजीचे मा. निवड समितीचे निर्णय.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM), आरोग्य विभाग, सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथून सोलापूर शहरातील विविध आरोग्य केंद्रास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेतील रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर भरण्याकरीता वेळोवेळी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. जाहीर प्रसिद्धकरणामधील नमूद पदाकरिता पात्र असलेल्या उमेदवारांची संदर्भ क्र. ३ चे मा. सेवकवर्ग निवड समितीचे निर्णयास अनुसरून खालील नमूद उमेदवारांची त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या पदनाम व मानधनावर दि. / ०७ /२०२५ ते दि. २९ / ०६/ २०२६ अखेर खालील शर्ती अटीस अधिन राहून आरोग्य विभागाकडील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) कडे नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | निवड प्रवर्ग | पदनाम | मानधन | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अमोल शिवाजीराव मुंडे | भ.ज.क. | SI | भ.ज.क. | MPW पुरुष | १८,०००/- प्रतीमाह | मार्कंडेय सभागृह (UHWC) |
| 2 | राहुल श्रीनिवास कोंडा | इ.मा.व. | SI | इ.मा.व. | MPW पुरुष | १८,०००/- प्रतीमाह | किसानसंकुल (UHWC) |
| 3 | शुभम दीपक कांबळे | इ.मा.व. | SI | इ.मा.व. | MPW पुरुष | १८,०००/- प्रतीमाह | हिप्परगा (UHWC) |
| 4 | सुमित विठ्ठल कुंभार | इ.मा.व. | SI | इ.मा.व. | MPW पुरुष | १८,०००/- प्रतीमाह | हिंदुहृयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कन्ना चौक |

**शर्ती व अटी :-**

१. वरील सर्व नियुक्ती ही 15 व्या वित्त आयोगांतर्गत कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि. 29/06/2026पर्यंतचा राहील. तसेच वर नमूद केलेले पदे नामंजूर / रद्द झाल्यास किंवा सन 2025-26 करीता मंजूर अप्राप्त राहिल्यास वरील सर्व पदांची सेवा दि. 29/06/2026 रोजी आपोआप संपुष्टात येईल. परंतू वरील पदे सन 2026-27 करिता मंजूर झाल्यास पुढील पुर्ननियुक्ती आपले कामकाज समाधानकारक असल्यासच देण्यात येईल.

२. उपरोक्त आदेशातील कर्मचाऱ्यांना कार्यक्रम निहाय निर्देशांक व मुल्यांकन करीता केलेल्या कामाचे दैनंदिन वर्कशिट ठेवावे. आरोग्यधिकारी यांनी सदरच वर्कशीटवरून सदर सेवकांचे दर महिना केलेल्या कामाचा आढावा घेवून अहवाल तयार करावे.

३. उपरोक्त तक्त्यातील कर्मचारी यांचे कार्यक्रम निहाय निर्देशांक व घटकानुसार मुल्यांकन अहवाल हा Excellent / Outstanding आहे त्यांनाच वार्षिक मानधनवाढ देण्यात येईल. तसेच नियुक्ती कालवधीमधील कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार मुल्यांकन अहवाल Good असेल तर त्यांना पुर्ननियुक्ती देण्यात येईल, तत्पुर्वी कर्मचारी यांना पुर्ननियुक्ती आवश्यक असल्यास त्याकरीता अर्ज सादर करावे लागेल.

४. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास अथवा आपले कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतेही पुर्व सूचना न देता आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

५. आपली नियुक्ती ही शासन सेवाप्रवेश नियमानुसार झालेली नसल्याने तसेच आपली नियुक्ती ही केवळतात्पुरत्या स्वरुपात असलेने महापालिकेच्या सेवेत कायम नोकरीबाबत भविष्यात कोणताही हक्क सांगता येणार नाही. अन्य कोणतेही लाभ, सेवेत समावेश वेतनश्रेणी, रजा, पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

६. आपणास नोकरीचा राजीनामा दयावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पुर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा ३० दिवसांचे एकवट मानधनाची रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहिल अथवा न भरल्यास आपल्या मानधनातून कपात करण्यात येईल.

७. उपरोक्त पदासाठी व कामकाजासाठी तसेच अन्य प्रशासकीय बाबी संदर्भात आरोग्य अधिकारी हे नियंत्रक राहतील. त्यांचा निर्णय अंतिम राहील व तो आपणावर बंधनकारक राहील.

८. रूजू होण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी पोलिस खात्याकडून ३० दिवसात चारित्र्य पडताळणी करून आरोग्यधिकारी यांचेकडे सादर करावे लागतील.

९. उमेदवारांनी सदर नेमणूकीचे आज्ञापत्र मिळालेपासून सात दिवसाचे आत कामावर रुजू होणे आवश्यक आहे. सदरचे आज्ञापत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसतील व ती कारणे मा. आयुक्त, सोमनपा यांचे समाधान करू शकत नसतील तर सेवकवर्ग समितीच्या निर्णयानुसार त्यांचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल. व त्यानंतर त्या पदावरील नेमणूकीबाबत त्यांची कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. रक्कम रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर उपरोक्त प्रमाणे शर्ती व अटी मान्य असलेबाबत प्रतिज्ञापत्र तयार करुन आरोग्य विभागाकडे द्यावे लागेल. सदर उमेदवांरानी प्रतिज्ञापत्र, लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र व चारित्र्य पडताळणी दाखला सादर केले नसल्यास आरोग्यधिकारी यांनी त्यांचे मानधन अदा करण्यात येऊ नये.

**११ उपरोक्त नमूद उमेदवारांची नियुक्ती 15 वा वित्त आयोग (UHWC) अंतर्गत असून हि पदे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाशी संबंधित नाहीत, त्यामुळे भविष्यात सदरील योजना / कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजुरी न मिळाल्यास उमेदवारांना राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये सामावून घेण्याचा दावा करता येणार नाही.**

**(डॉ. सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा अध्यक्ष,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती सोलापूर.**

प्रति,
**१. संबंधित उमेदवार.**

प्रत पुढील कार्यवाहीस्तव:-

**१. आरोग्याधिकारी कार्यालय** **२. NUHM कार्यालय** **३. संगणक विभाग**